दूरध्वनी क्र. 022-27571388
ईमेल-ddikon12@gmail.com

क्र. विमाका/कोवि/शा.मा.द./ ४२८
**विभागीय माहिती कार्यालय**
कोकणविभाग, कोकणभवन,
रुम न. 317, तिसरा मजला,
नवी मुंबई-400 614
दिनांक :- 17 JAN 2019

संदर्भ :- 1) शासन निर्णय, सा. प्र. वि. क्रमांक : पीयूबी/1000/प्र.क्र.73/2000/34,
दि. 1 मे, 2001
2) शासन निर्ण्य क्रमांक : जाहिरात/2009/प्र.क्र.137/का-34, दि. 31 ऑगस्ट, 2009
3) शासन निर्णय सा.प्र.वि. क्र. मावज-2018/प्र.क्र.348/34, दि. 20 डिसेंबर, 2018

**दर प्रमाणपत्र**

प्रमाणित करण्यात येते की, हे वृत्तपत्र शासनमान्य जाहिरात यादीत **'क'** या संवर्गात समाविष्ट आहे. संदर्भांकित क्र. 3 च्या शासन निर्णयातील नियम क्र. 4.5.2 मधील सुत्रानुसार या नियतकालिकाचा महासंचालनायाकडे उपलब्ध असलेल्या नोंदीनुसार, 3,500 खपाच्या आधारे जाहिरातीचा दर प्रती चौ. सें. मी. रु. 16/- **(रुपये सोळा फक्त)** निश्चित करण्यात आला आहे.

कृष्णधवल जाहिरातीच्या मूळ दरावर 40% अधिक रंगीत दर देण्यात येत आहे. पहिल्या पानाकरिता, नावीन्यपूर्ण उपक्रमाकरिता (फ्रेंच विंडो, हाफ फ्लॅप, सोलो जाहिरात) 50% अधिक दर तसेच जॅकेट पेजसाठी 100% अधिक दर त्याचप्रमाणे विशिष्ट पानावर जाहिरातीचा मजकूर प्रसिध्द करण्यासाठी कार्यादेशात नमूदअसल्यास 25% अधिक दर देण्यात येईल.

हा दर सर्व शासकीय विभाग, कार्यालये, महामंडळे, मंडळे, प्राधिकरणे, उपक्रम, आयोग, स्थानिक स्वराज्य संस्था, इतर स्वायत्त संस्था, जिल्हा परिषद, नगर परिषद, शासन पुरस्कृत सहकारी संस्था इत्यादींच्या वर्गीकृत व दर्शनी जाहिरातींना लागू राहतील.

उपरोक्त नमूद केलेली नियमावली आणि दर दि. 1 जानेवारी, 2019 पासून अंमलात आले आहेत.

उपसंचालक (माहिती)
कोकण विभाग, नवी मुंबई

टिप :- दि. 1 जानेवारी, 2019 पासून जाहिरातीच्या प्रत्येक देयकासोबत या आदेशाची प्रत जोडण्यात यावी.

प्रति,
**संपादक/जाहिरात व्यवस्थापक,**
दैनिक महाराष्ट्र जनमुद्रा, ठाणे

प्रत :- जिल्हा माहिती अधिकारी, ठाणे यांना कळविण्यात येते की, या वृत्तपत्राच्या नवीन दराची नोंद आपल्या संबंधित अभिलेख्यात घेऊन पुढील कार्यवाही करावी.